राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र : २५२/२०२४/नाशिक

तक्रारदार	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी
श्री.मुश्ताक अहमद कमालुद्दीन, रा.स.नं.१०१, प्लॉट नं. १६९, फार्मेसी नगर, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक-४२३२०३.	प्रशासनाधिकारी, मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळ, महा.न.पा. जुनी इमारत, भुईकोट किल्ला समोर मालेगाव, ता. मालेगाव,जि. नाशिक.	उपायुक्त, मालेगाव महानगरपालिका, महा.न.पा. जुनी इमारत, भुईकोट किल्ला समोर मालेगाव, ता. मालेगाव,जि. नाशिक.

सुनावणी दिनांक २०/११/२०२५

तक्रारदार यांनी दिनांक २४/०४/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २०/११/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार यांच्या तर्फे प्रतिनिधी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक २४/०४/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "मी दि.०६/०२/२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अर्ज केला त्यांनी माहिती दिली नाही. तसेच पत्र दिले नाही. दि. ११/०१/२०२४ रोजी अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिल दाखल केले व अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली परंतु आदेश दिले नाहीत. आजपर्यंत माहिती मिळाली नाही. म्हणून ही तक्रार. तरी माहिती विनामुल्य मिळावी व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेवर नियमानुसार कार्यवाही करावी, ही विनंती."

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०६/०२/२०२४ रोजीच्या माहिती अर्जाच्या व दि. ११/०१/२०२४ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे मात्र तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता तक्रार अर्जासोबत वर नमूद माहिती अर्ज सोबत जोडलेले नसून तक्रार अर्जासोबत जोडलेल्या माहिती अर्जाचा दिनांक व तक्रारअर्जात नमूद केलेले दिनांक यामध्ये विसंगती असल्याचे दिसून येते. तक्रारदार यांनी माहितीचा अर्ज तक्रार अर्जासोबत सादर केला नसल्याने माहितीचा विषय कळून येत नाही.

त्यामुळे तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मोघम स्वरूपाचा ठरतो. तसेच सुनावणीवेळी उपस्थित तक्रारदार यांचे प्रतिनिधी यांना तक्रारदार यांनी आयोगास सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विचारणा केली असता काहीही सांगता आलेले नाही. त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशीयोग्य नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

प्रस्तूत तक्रार क्र. **२५२/२०२४/नाशिक** निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

02 APR 2026

जावक क्र २६०६